**प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन**
उप आयुक्त (पुनर्वसन) व जिल्हा पुनर्वसन
अधिकारी यांना सोई सुविधा
उपलब्ध करुन देण्याबाबत.

**महाराष्ट्र शासन**

महसूल व वन विभाग

शासन परिपत्रक क्रमांक : सुविधा -२०११/प्र.क्र. १२८/र-१

मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२

दिनांक :- २२ मार्च, २०११

राज्याच्या विकासासाठी राज्यामध्ये विविध विकास प्रकल्प ( प्रामुख्याने पाटबंधारे ) उभारले जातात. या प्रकल्पामुळे बाधित होणा-या व्यक्तींचे योग्य व दर्जेदार पुनर्वसन व्हावे यासाठी राज्य शासनाने **महाराष्ट्र प्रकल्प बाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम १९९९** पारित केला असून त्या नुसार सर्व संबंधित विभागांनी कार्यवाही करणे आवश्यक आहे.

२. राज्यामध्ये आतापर्यत उभांरण्यात आलेल्या / सुरु असलेल्या पाटबंधारे प्रकल्पांचा आढावा घेतल्यावर शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, ब-याच प्रकल्पामध्ये पुनर्वसनाचे अनेक प्रश्न अजूनही शिल्लक आहेत व प्रकल्पग्रस्तांचे योग्य व दर्जेदार पुनर्वसन व्हावयाचे आहे.

३. या अधिनियमाप्रमाणे पुनर्वसनाची सर्व जबाबदारी संबंधित प्रकल्प यंत्रणेची ( मुख्यता पाटबंधारे विभागाची ) आहे. मात्र महाराष्ट्र प्रकल्प बाधीत व्यक्तींचें पुनर्वसन अधिनियम,१९९९ च्या कलम ३ प्रमाणे विभागीय आयुक्त मुख्य नियंत्रण अधिकारी आहेत.

४. प्रकल्पग्रस्ताचे योग्य व दर्जेदार पुनर्वसन व्हावे या करीता आयुक्त स्तरावर उप आयुक्त (पुनर्वसन) व प्रत्येक जिल्हयामध्ये जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांचे पद निर्माण करुन योग्य अशा प्रकारची आस्थापना निर्माण करण्यात आलेली आहे. पुनर्वसन यंत्रणेला प्रभावीपणे काम करता यावे म्हणून शासन निर्णय क्रमांक आरपीए-२००६/प्र.क्र.(१)(२)/र-१,दिनांक १७/३/२००६ अन्वये खालीलप्रमाणे निर्णय घेण्यात आलेले आहेत.

मंत्रालय, विभागीय आयुक्त व जिल्हास्तरावरील पुनर्वसनाचे कामकाज हाताळणा-या कार्यालयामध्ये स्टेशनरी, झेरॉक्स मशीन, फॅक्स मशीन, कॉम्पुटर इत्यादी तसेच लिपिक-टंकलेखक, लघुलेखक तथा अन्य आवश्यक पदे तसेच वाहनचालक व इंधनाच्या खर्चासह वाहने पुरविण्याची विनंती जिल्हास्तरावर पुनर्वसन प्रशासक (जिल्हाधिकारी ), विभागीय स्तरावर पुनर्वसन आयुक्त ( विभागीय आयुक्त) व शासनस्तरावर सचिव (पुनर्वसन ) यांच्या मान्यतेने पुनर्वसन यंत्रणेने संबंधित प्रकल्प संस्थेकडे केल्यास त्यांची पूर्तता करणे संबंधित प्रकल्प संस्थेची जबाबदारी असेल.

जिल्हाधिकारी कार्यालय रत्नागिरी
शाखा I-ACS Dictn.lwp
आवक नं.:- शेटा/एच ३५४३ (२५०-३-११)
30 MAR 2011
विशेष ... नं.:-
कार्य विवरण नं.:-

५. प्रकल्पग्रस्तांचे योग्य व दर्जेदार पुनर्वसन निश्चित कालावधीत होणे आवश्यक आहे. म्हणून सर्व प्रकल्प यंत्रणेने ( प्रामुख्याने पाटबंधारे विभाग ) यांनी वर नमुद केलेला शासन निर्णय दिनांक १७/३/२००६ प्रमाणे उप आयुक्त पुनर्वसन व जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांना सर्व सोई सुविधा उपलब्ध करुन देणे आवश्यक आहे. असे असतांनाही ब-याचशा प्रकरणी पाटबंधारे विभागाने अशा प्रकारच्या सोई सुविधा उपलब्ध करुन दिलेल्या नाहीत. जेणेकरुन पुनर्वसनाच्या कामाकडे पाहिजे तेवढे लक्ष उप आयुक्त पुनर्वसन व जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांना देणे शक्य झाले नाही.

६. वरील परिस्थितीत तातडीने सुधारणा करणे आवश्यक आहे म्हणून शासन खालीलप्रमाणे आदेश देत आहे.

१) संबंधित प्रकल्पयंत्रणेने शासन निर्णय कमांक आरपीए-२००६/प्र.क्र.(१)(२)/र-१ दिनांक १७/३/२००६ प्रमाणे उप आयुक्त पुनर्वसन व जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांना सर्व सुविधा उपलब्ध करुन द्याव्यात.

२) विभागीय आयुक्त यांनी उप आयुक्त पुनर्वसन व जिल्हा पुनर्वसन अधिकारी यांना कोण कोणत्या सुविधा आवश्यक आहेत याचा आढावा घ्यावा व त्या पुरविण्याबाबत संबंधित प्रकल्प यंत्रणेला सूचित करावे या प्रमाणे सुविधा पुरविण्याची सर्व जबाबदारी प्रकल्पयंत्रणेची राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने

(प्रविण पाटील)
कक्ष अधिकारी

प्रति,
मा.राज्यपाल यांचे सचिव
मा. मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा.उप मुख्यमंत्र्यांचे सचिव
मा. मंत्री ( म व पु ) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, ( म. व पु. ) यांचे खाजगी सचिव
मंत्रालयीन सर्व विभाग
सर्व विभागीय आयुक्त
सर्व कार्यकारी संचालक, पाटबंधारे विकास महामंडळे
सर्व जिल्हाधिकारी
सर्व जिल्हा पुनर्वसन अधिकारी
सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई
निवड नस्ती र-१

12ACS Dictn.lwp
एच-३५४३-१अ